सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

अतितात्काळ/कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1718
दिनांक :- 23 JUN 2023

प्रति,

प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :- :-** १.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. :- १०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४ दिनांक १३ जून २०२३.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/१६५२ दिनांक १४ जुन २०२३.
३. विकाअ/शिक्षण/२०२३/१७०४ दिनांक २२ जुन २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संचालनालयामार्फत प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी अभियांत्रिकी पदविका तसेच प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशाकरीता ऑनलाईन केन्द्रीभुत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. सदर पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचुक व अद्ययावत करण्याचे संदर्भात या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये आपणास कळविण्यात आलेले होते.

तथापी तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या मार्फत सदर अभ्यासक्रमाची माहीती कन्फर्म करण्याची लिंक उपलब्ध झालेली नसलेने तसेच सदर अभ्यासक्रमाचे माहीती अद्ययावत करण्याचे Module Activate (Updation) करण्याचे काम संचालनालय स्तरावर सुरु असल्याने सदर अभ्यासक्रमाची माहीती अद्ययावत करण्याची लिंक उपलब्ध होताच आपणास नविन वेळापत्रक लवकरच कळविण्यात येईल असे या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्यामार्फत लिंक उपलब्ध झाल्याने यासोबत जिल्हानिहाय वेळापत्रक जोडलेले असून त्यामध्ये आपल्या जिल्हयाचे नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास या कार्यालयात आवश्यक मान्यतेच्या पत्रासह सबंधित काम हाताळणारे अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन माहीती अद्ययावत करुन घ्यावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहिती संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. यामध्ये कोणतीही चुक झाल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करण्याकरीता जिल्हानिहाय उपस्थित राहण्याबाबतचे

## संस्थांचे वेळापत्रक

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | दिनाक |
|---|---|---|---|
| १ | अमरावती | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था. | दिनांक २६/०६/२०२३ |
| २ | वाशिम | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था. | दिनांक २७/०६/२०२३ |
| ३ | अकोला | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था. | दिनांक २८/०६/२०२३ |
| ४ | बुलढाणा | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था. | दिनांक २९/०६/२०२३ |
| ५ | यवतमाळ | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था. | दिनांक ३०/०६/२०२३ |

**प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण**
अमरावती